नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १७८ Issue - 178 | वार - बुधवार दि. २५ नोव्हेंबर २०२६ Blow- Friday Date 25 NOVEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

नोकरभरतीच्या पेपर फोडणाऱ्यांची खैर नाही; १० कोटींचा दंड ठोठावला जाणार

१० वर्षांपर्यंत कारावासाची शिफारस; राज्य सरकारच्या उच्चस्तरीय समितीचा दुसरा अहवाल सादर

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : मागील अनेक महिन्यात पेपर फुटीच्या अनेक घटना घडल्या. एम पीएससी आयोगाचे नोकरभरतीच्या पेपर फ ुटल्याचे समोर आले. पेपरफुटीच्या आडून काळा कारभार सुरू होता. या कारभाराला सरकारकडून चाप बसवला जाणार आहे. सरकारच्या नव्या कायद्याने आता पेपर फोडणाऱ्यांची खैर नाही. आता पेपरफुटी करणाऱ्यांवर १० कोटींचा दंड ठोठावला जाणार आहे. तसेच १० वर्षांपर्यंत कारावासाची शिफारस करण्यात आली आहे. भरती आणि स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी राज्य सरकारच्या उच्चस्तरीय समितीचा दुसरा अहवाल सादर करण्यात आला. त्यात पेपरफुटी आणि संघटित गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर कायद्याची शिफारस करण्यात आली आहे.

संघटित गुन्हेगारीत सहभागी व्यक्ती आणि संस्थांना ७ ते १० वर्षांच्या कारावासाची शिफारस करण्यात आली आहे. किमान १० कोटी रुपयांचा दंड आणि मालमत्ता जप्त करण्याची तरतूद सुचवली आहे. अनुचित साधनांचा वापर करणाऱ्यांना ५ ते १० वर्षे कारावास आणि ५० लाखांपर्यंत दंड ठोठावला जाणार आहे. गैरप्रकारात सहभागी सेवा पुरवठादार संस्थांना ५ कोटींपर्यंत दंड आणि ८ वर्षांसाठी बंदी घातली आहे. परीक्षा गैरप्रकारांचा तपास वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांमार्फत करण्याची शिफारस करण्यात आली आहे. गंभीर प्रकरणांच्या तपासासाठी विशेष कृती दल (डढक्र) स्थापन करण्याची सूचना करण्यात आल्या आहेत. परीक्षा गैरप्रकारांचे खटले जलदगतीने निकाली काढण्यासाठी विशेष न्यायालयांची शिफारस करण्यात आली आहे.

सरकारच्या निर्णयाने एमपीएससी परी-क्षार्थींना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. परीक्षा दिल्यानंतर उमेदवारांना संपूर्ण परीक्षा शुल्क परत करण्याची शिफारस केली जाणार आहे. तसेच उत्तरतालिकेवरील उमेदवाराची हरकत योग्य ठरल्यास हरकतीसाठी भरलेले शुल्कही परत मि ळणार आहे. दरवर्षी ऑक्टोबरपर्यंत पुढील वर्षाचे वार्षिक परीक्षा वेळापत्रक जाहीर करण्याची सूचना देण्यात आल्या आहेत. उमेदवारांसाठी आधार किंवा चरहरखऊ द्वारे एकदाच नोंदणीची सुविधा मिळणार आहे. परीक्षांवर देखरेख ठेवण्यासाठी त्रिस्-तरीय कमांड अँड कंट्रोल सेंटर उभारण्याची शिफारस करण्यात आली आहे. परीक्षा प्रक्रियेत मोठे प्रशासकीय बदल सुचवण्यात आले आहेत.

रिक्त पदांची माहिती वेळेत मिळण्यासाठी खपींशसीरींशव ठशींळीळींळेप झेींरश्र विकसित करण्याची शिफारस करण्यात आली आहे. सप्टेंबरअखेरपर्यंत विभागांनी भरतीचे मागणीपत्र एमपीएससीकडे पाठवावे, अशा सूचना करण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र परीक्षा शाखा स्थापन करण्याची सूचना करण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर परीक्षा केंद्रांची स्वतंत्र बँक (तशर्पीश इरपज्ञ) तयार करण्याची शिफारस करण्यात आली आहे. परीक्षा केंद्रांच्या निवडी आणि व्यवस्थापनाची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांकडे देण्याची सूचना करण्यात आली आहे. परीक्षा प्रक्रियेतील सायबर सुरक्षेसाठी स्वतंत्र तंत्रज्ञान आणि सायबर सुरक्षा कक्ष स्थापन करण्याची शिफारस करण्यात आली आहे. राज्यातील भरती परीक्षा अधिक पारदर्शक आणि सुरक्षित करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचललं आहे. राज्यातील भरती परीक्षा प्रक्रिया पद्धतीत सुधारणा करण्यासाठी ४ सप्टेंबर २०२६ रोजी उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली. समितीचा दुसरा अहवाल २३ नोव्हेंबर २०२६ रोजी शासनाला सादर करण्यात आला आहे. या शिफारशींच्या अंमलबजावणीनंतर राज्यातील स्पर्धा परीक्षा प्रक्रियेत मोठे बदल पाहायल मिळण्याची शक्यता आहे.

शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक शरणकुमार लिंबाळे



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक शरणकुमार लिंबाळे यांची निवड झाली आहे. आज साहित्य महामंडळाची पुण्यात बैठक पार पडली. या बैठकीमध्ये शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून, शरणकुमार लिंबाळे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आलं. शरणकुमार लिंबाळे हे मूळचे सोलापूर जिल्ह्यातील आहेत. त्यांनी आत्तापर्यंत ४० पेक्षा जास्त पुस्तकांचे लिखाण केले आहे. ज्येष्ठ मराठी साहित्यिक, कादंबरीकार आणि समीक्षक अशी त्यांची ओळख आहे.

महाराष्ट्राच्या सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील हन्नूर या गावात १ जून १९५६ रोजी शरणकुमार लिंबाळे यांचा जन्म झाला. सामाजिक विषमता, जातिव्यवस्थेची उतरंड, अस्पृश्यता आणि वंचित समूहांच्या जगण्यातील संघर्ष यांचे वास्तव त्यांनी बालपणापासून अनुभवले. त्यांच्या आयुष्याच्या जडणघडणीत या अनुभवांचा मोठा वाटा राहिला. पुढे याच अनुभवांनी त्यांच्या साहित्याला आशय, दिशा आणि वैचारिक अधिष्ठान दिले.

लिंबाळे यांच्या व्यावसायिक कारकिर्दीची सुरुवात दूरसंचार विभागात टेलिफोन ऑपरेटर म्हणून झाली. त्यानंतर १९८६ ते १९९२ या काळात त्यांनी आकाशवाणीच्या सोलापूर केंद्रावर उद्घोषक म्हणून काम केले. पुढे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या प्रकाशन विभागात सहाय्यक संपादक म्हणून त्यांनी काम सुरू केले. विद्यापीठात प्राध्यापक आणि संचालक अशा जबाबदाऱ्या सांभाळत त्यांनी शैक्षणिक क्षेत्रातही स्वतंत्र ओळख निर्माण केली. लिंबाळे यांनी साहित्याच्या विविध प्रकारांत लेखन केले आहे. त्यांच्या कादंबऱ्यांम ध्ये सामाजिक इतिहास, जातिव्यवस्था, सांस्कृतिक संघर्ष आणि वंचित समूहांचे जगणे यांचे चित्रण आढळते. 'उपल्या', 'हिंदू', 'बहुजन', 'झुंड', 'सनातन' आणि 'रामराज्य' या त्यांच्या महत्त्वाच्या कादंबऱ्या आहेत. 'दलित ब्राह्मण', 'देवता आदमी' हे त्यांचे कथासंग्रह चर्चेत राहिले. 'उद्रेक', 'ओ' आणि 'यलगार' या कविता आणि काव्यलेखनातूनही त्यांनी सामाजिक वास्तवाला अभिव्यक्ती दिली. त्यांच्या लेखनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव जाणवतो. स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठा ही मूल्ये त्यांच्या साहित्याच्या केंद्रस्थानी आहेत. लिंबाळे यांच्या साहित्यिक प्रवास-ातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे 'सनातन' ही कादंबरी. २०१८ मध्ये प्रकाशित झालेल्या या कादंबरीतून त्यांनी भारतीय समाजातील जातिव्यवस्थेचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक पट उलगडला. अस्पृश्य समाजाचे जगणे, त्यांचा संघर्ष, इतिहासातील योगदान आणि सामाजिक व्यवस्थेतील स्थान यांची व्यापक मांडणी या कादंबरीत त्यांनी केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भूमिका

शरद पवार आजही सक्रिय, त्यांच्या निवृत्तीची चर्चा करणं योग्य नाही



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नागपूर : संसदेचं हिवाळी अधिवेशन आगामी काळात सुरु होणार आहे. हे अधिवेशन जास्त महत्त्वाचं मानलं जात आहे. कारण याआधीच्या विशेष अधिवेशनात केंद्र सरकारने मतदारसंघ पुनर्रचना विधेयक लोकसभेत सादर केलं होतं. पण हे विधेयक मंजूर होऊ शकलं नव्हतं. यानंतर आता केंद्र सरकारककडून हे विधेयक मंजूर व्हावे यासाठी पडद्यामागे मतांच्या आकडेवारीची तयारी सुरु आहे. या विधेयकाला मंजूर करण्यासाठी योग्य आकडेवारी सरकार गाठू शकणार का? हे पाहणं औत्सुक्याचं आहे. याच विधेयकाच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाबाबत सातत्याने चर्चा समोर येत आहेत.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी सरकारच्या डिलिमिटेशन विधेयकाला पाठिंबा देण्याची शक्यता आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनी याबाबत सकारात्मक भूमिका मांडली आहे. यामुळे शरद पवारांचा पक्षही एनडीएत सहभागी होऊ शकतो, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहेत. पण या चर्चा सुप्रिया सुळे यांनी स्वत: फेटाळल्या आहेत. तसेच दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार नसल्याचं सुप्रिया सुळे यांनी वारंवार स्पष्ट केलं आहे. असं असलं तरी शरद पवार आणि त्यांच्या राष्ट्रवादीबाबत उलटसुलट चर्चा सुरु आहेत. अखेर या चर्चांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाची प्रतिक्रिया दिली आहे.

शरद पवार साहेबांना उत्तम आरोग्य लाभावे, ही सर्वांची इच्छा आहे. पवार साहेब आजही सक्रिय असून, विविध प्रकल्प आणि कामांमध्ये ते सातत्याने रस घेतात. मी त्यांना जवळून पाहिले आहे. त्यामुळे त्यांच्या निवृत्तीबाबत चर्चा करणे योग्य नाही, पवार साहेब हे आयुष्यात कधीच थांबणार नाहीत, असा मला विश्वास आहे. ते यापुढेही काही ना काही सकारात्मक काम करत राहतील. त्यामुळे त्यांच्या निवृत्तीबाबत अशा प्रकारच्या चर्चा करण्याचे कारण नाही, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

दुरावा संपला! पंजाबमध्ये भाजप-अकाली दल पुन्हा एकत्र

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : भारतीय जनता पक्ष आणि शिरोमणी अकाली दल यांनी आज (२४ नोव्हेंबर) २०२७च्या पंजाब विधानसभा निवडणुका एकत्र लढवण्याची घोषणा केली. २०२० मध्ये अकाली दल एनडीएतून बाहेर पडल्यानंतर सहा वर्षांनी पुन्हा हे दोन्ही पक्ष एकत्र दिसणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजप अध्यक्ष नितीन नबीन आणि शिरोमणी अकाली दलाचे प्रमुख सुखबीर सिंग बादल यांनी दिल्लीतील भाजप मुख्यालयात आयोजित संयुक्त पत्रकार परिषदेत युतीची घोषणा केली. २०२७ च्या पंजाब विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूम ीवर ही युती महत्त्वाची मानली जात आहे. शिरोमणी अकाली दल आणि भाजपने पंजाबमध्ये पाच विधानसभा निवडणुका एकत्र लढवल्या आहेत. या दोन पक्षांनी १९९७, २००२, २००७, २०१२ आणि २०१७ च्या विधानसभा निवडणुकांमध्ये युती केली होती. यापैकी तीन वेळा, १९९७, २००७ आणि २०१२ मध्ये या दोन पक्षांनी एकत्र सरकार स्थापन केले होते. तथापि, सप्टेंबर २०२० मध्ये कृषी कायद्यांच्या मुद्द्यावरून या दोन पक्षांमधील युती तुटली.

दोन पक्षांच्या युतीमागील मुख्य कारण म्हणजे त्यांची मतपेढी आणि प्रादेशिक



प्रभाव. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला पंजाबमध्ये अंदाजे २५ लाख म ते, म्हणजेच १८.५६ टक्के मिळाली. तर अकाली दलाला अंदाजे १८ लाख मते, म्हणजेच १३.४२ टक्के मिळाली. या दोन्ही पक्षांची मते मिळून एकूण संख्या अंदाजे ४३ लाख होते आणि एकूण मतांचा वाटा अंदाजे ३२ टक्के होतो. २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत अकाली दल-ाला अंदाजे २८. ६१ लाख मते मिळाली म्हणजेच मतांचा १८.३८ टक्के वाटा. भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांना अंदाजे १२ लाख मते मिळाली म्हणजेच मतांचा ८ टक्के वाटा. त्यांची एकत्रित मते अंदाजे ४० ते ४१ लाखांपर्यंत पोहोचतात. दुसरीकडे, २०२० च्या विधानसभा निवडणुकीत आम आदमी पार्टीने ४२ टक्के मते मिळवून ९२ जागा जिंकल्या. काँग्रेसला २२.९८ टक्के मते मिळाली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत पंजाबमध्ये आपचा मतांचा टक्का २६.३० टक्क्यांपर्यंत घसरला, तर काँग्रेसला २६.०२ टक्के मते मिळाली.

शिरोमणी अकाली दल हा भाजपच्या सर्वात जुन्या मित्रपक्षांपैकी एक आहे. १९९६ च्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रकाश सिंग बादल यांनी भाजपला पाठिंबा जाहीर केल्यावर या दोन पक्षांनी १९९६ मध्ये हातमिळवणी केली आणि १९९७ च्या पंजाब निवडणुकांपूर्वी औपचारिक युती जाहीर करण्यात आली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकांपूर्वी दोन्ही पक्षांनी हातमिळवणी करण्याच्या शक्यतेवरही विचार केला होता, परंतु प्रस्तावित युतीच्या अटींवर मतभेद झाल्याम ुळे चर्चा फिस्कटली. गेल्या काही म हिन्यांत, विशेषत: पंजाबमध्ये एनडीए पुढचे सरकार स्थापन करेल असे अमित शाह यांनी वारंवार सांगितल्यानंतर पुनर्मिलनाच्या चर्चेने पुन्हा वेग घेतला आणि आज युतीची अधिकृतपणे घोषणा करण्यात आली.

या दोन पक्षांमधील युती सप्टेंबर २०२० मध्ये तीन कृषी कायद्यांच्या मुद्द्यावरून तुटली होती. कृषी कायद्यांना सुरुवातीला पाठिंबा देणाऱ्या शिरोमणी अकाली दलावर पंजाबमध्ये या कायद्यांविरोधात भूमिका घेण्यासाठी दबाव वाढू लागला. त्यानंतर १७ सप्टेंबर २०२० रोजी अकाली दलाच्या नेत्या आणि केंद्रीय मंत्री हरसिमरत कौर बादल यांनी कृषी विधेयकांच्या निषेधार्थ केंद्रीय मंत्रिमंडळातून राजीनामा दिला. यानंतर अवघ्या नऊ दिवसांनी, म्हणजे २६ सप्टेंबर २०२० रोजी शिरोमणी अकाली दलाने छऊ मधून बाहेर पडण्याची घोषणा केली. नोव्हेंबर २०२१ मध्ये केंद्र सरकारने हे तीन कृषी कायदे मागे घेतले. मात्र, त्यानंतरही भाजप आणि अकाली दलातील राजकीय दुरावा कायम राहिला.

७६ नवीन हेलिकॉप्टर ताफ्यात येणार

लष्कर आणि हवाई दलासाठीही ४०० हेलिकॉप्टरची योजना

भारतीय नौदल आणि तटरक्षक दलासाठी १५ हजार कोटींचा हेलिकॉप्टर खरेदी प्रस्ताव

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

दिल्ली : भारतीय नौदल आणि भारतीय तटरक्षक दलाच्या जुन्या हेलिकॉप्टर ताफ्याचे आधुनिकीकरण करण्यासाठी मोठी तयारी सुरू आहे. दोन्ही दलांकडून सुमारे १५,००० कोटी रुपये खर्चून ७६ नवीन युटिलिटी हेलिकॉप्टर खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे. या हेलिकॉप्टरमुळे जुन्या चीता आणि चेतक हेलिकॉप्टरची जागा घेतली जाणार आहे.

या प्रस्तावानुसार, भारतीय नौदलाला ५१, तर तटरक्षक दल-ाला २५ हेलिकॉप्टर मिळणार आहेत. संरक्षण सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकल्पात भारतीय कंपन्या परदेशी हेलिकॉप्टर उत्पादकांसोबत भागीदारी करणार आहेत. हेलिकॉप्टरचे उत्प-ादन भारतातच केले जाणार असून, ही खरेदी 'मेक इन इंडिया' उपक्रमांतर्गत होणार आहे.

संरक्षण मंत्रालयाकडून प्रस्तावावर चर्चा होण्याची शक्यता

संरक्षण मंत्रालयाच्या उच्चस्तरीय बैठकीत लवकरच या प्रस्तावावर चर्चा होण्याची शक्यता आहे. संरक्षण संपादन प्रक्रियेतील 'बाय अँड मेक (इंडियन)' श्रेणीअंतर्गत हा प्रकल्प पुढे नेण्याची योजना आहे.

५ टनांपेक्षा अधिक क्षमतेची हेलिकॉप्टर

नौदल आणि तटरक्षक दलाला ५



टनांपेक्षा अधिक वजनाच्या श्रेणीतील हेलिकॉप्टर ताफ्यात समाविष्ट करायची आहेत. सध्याच्या जुन्या दुहेरी इंजिन असलेल्या हेलिकॉप्टरच्या वापरातील अडचणी आणि त्यांची जागा नवीन हेलिकॉप्टरने घेण्याची गरज लक्षात घेता हा प्रस्ताव महत्त्वाचा मानला जात आहे.

नवीन हेलिकॉप्टरचा वापर सागरी निगराणी, टेहळणी, शोध आणि बचाव मोहिमा तसेच इतर लष्करी कामांसाठी केला जाणार आहे. विशेषत: दूरवरच्या सागरी भागांमध्ये देखरेख आणि आपत्कालीन मदत पोहोचवण्यासाठी ही हेलिकॉप्टर उपयुक्त ठरतील.

भारतीय लष्कर आणि हवाई दलद-ेखील जुन्या हलक्या हेलिकॉप्टरच्या जागी नवीन हेलिकॉप्टर आणण्याच्या तयारीत आहेत. दोन्ही दलांसाठी सुमारे ४०० हलकी हेलिकॉप्टर खरेदी करण्याची योजना आहे. यापैकी २०० हेलिकॉप्टर हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमि टेड तयार करणार आहे. उर्वरित २०० हेलिकॉप्टर खासगी कंपन्या परदेशी उत्पादकांच्या भागीदारीत बनवतील.

खासगी क्षेत्राकडून २०० हेलिकॉप्टर तयार करण्याच्या प्रस्ता-वाला संरक्षण खरेदी परिषदेने मंजुरी दिली आहे. या प्रकल्पासाठी लवकरच निविदा प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे.

नौदलाकडून ६० स्वदेशी हेलिकॉप्टरचीही योजना

याशिवाय भारतीय नौदल कक्ष कडून स्वदेशी बनावटीची ६० युटिलिटी हेलिकॉप्टर मरीन खरेदी करण्याची योजना आखत आहे. या हेलिकॉप्टरचा वापर नौदलाच्या विविध सागरी मोहिम ांसाठी केला जाणार आहे.

सीमावर्ती भागांपासून सागरी म ोहिमांपर्यंत वापर

भारतीय संरक्षण दलांसाठी हलकी हेलिकॉप्टर महत्त्वाची भूमिका बजा-वतात. सियाचीनपासून अरुणाचल प्रदेशापर्यंतच्या संवेदनशील भागांत टेहळणी, निगराणी आणि लष्करी मोहिमांसाठी त्यांचा वापर होतो. तर नौदल आणि तटरक्षक दल सागरी देखरेख, शोध आणि बचाव कार्यासाठी हेलिकॉप्टरचा वापर करतात.

भारतीय संरक्षण दलांना एकूण सुमारे ५०० हलक्या हेलिकॉप्टरची आवश्यकता असल्याचे सांगितले जाते. अशा परिस्थितीत नौदल आणि तटरक्षक दलासाठी प्रस्तावित ७६ हेलिकॉप्टरची खरेदी ही संरक्षण दलांच्या जुन्या ताफ्याचे आधुनिकीकरण करण्याच्या दिशेने महत्त्वाची घडामोड ठरू शकते.

संपादकीय....

ऐतिहासिक द्विशतक

क्रिकेटच्या मैदानावर आज इतिहास घडला आहे! अवघ्या १५ वर्षांच्या वैभव सूर्यवंशीने आपल्या आक्रमक फलंदाजीने क्रिकेटविश्वाला थक्क करत अवघ्या ५२ चेंडूत द्विशतक झळकावलं आहे. सलग २ षटकार मारत वैभवने २०० धावांचा ऐतिहासिक टप्पा गाठला आणि आनंदात हात उंचावत या अविश्वसनीय पराक्रमाचा जल्लोष केला. वरिष्ठ व्यावसायिक क्रिकेटच्या इतिहासातील हे सर्वात वेगवान द्विशतक ठरल्याचा दावा करण्यात आला आहे. वैभव सूर्यवंशीने आपल्या २०० धावांच्या कामगिरीत २८ षटकार आणि ७ चौकार मारले. वैभव सूर्यवंशीने ५२ चेंडूत द्विशतक पूर्ण केलं. यावेळी त्याचा स्ट्राईक रेट हा ३९२.३१ चा होता. आशिया कप रायझिंग स्टार्स २०२६ स्पर्धेत एए विरुद्ध भारत संघाकडून खेळताना वैभवने सुरुवातीपासूनच गोलंदाजांवर आक्रमण केले. त्याने अवघ्या १६ चेंडूत अर्धशतक पूर्ण करत आपल्या फलंदाजीची ताकद दाखवली. त्यानंतरही त्याचा धावांचा वेग कमी झाला नाही. चौकार आणि षटकारांच्या जोरावर त्याने धावांचा अक्षरशः पाऊस पाडला आणि ५२ चेंडूत द्विशतक पूर्ण करत इतिहास रचला आहे. त्याने अवघ्या २८ चेंडूत शतक पूर्ण केलं, त्याने १४ षटकारांच्या मदतीने शतक ठोकलं. एए ने प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत ८ विकेट्स गमावत २४९ धावा केल्या. एए कडून हरप्रीत सिंह भाटियाने १४४ चेंडूत १३० धावांची शानदार खेळी केली. भारताकडून अरशद खानने ४ विकेट्स घेत प्रभावी गोलंदाजी केली. २५० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना वैभवच्या आक्रमक खेळीमुळे भारत संघाने सामना पूर्णपणे आपल्या नियंत्रणात आणला. वैभवच्या या ऐतिहासिक खेळीमुळे भारतीय क्रिकेटमध्ये एका नव्या विक्रमाची नोंद झाल्याची चर्चा सुरू झाली आहे.१५ वर्षांच्या वयात एवढा मोठा पराक्रम गाजवणाऱ्या वैभव सूर्यवंशीच्या या खेळीने क्रिकेटप्रेमींना थक्क केले.

निवड होताच बुडाला आग, पोस्टी टाकून सोडत आहेत वाफ

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत आणि दलित साहित्याचे भाष्यकार प्रा. डॉ. शरणकुमार लिंबाळे यांची शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. प्रा. डॉ. शरणकुमार लिंबाळे यांनी दलित साहित्याला वैचारिक व समीक्षात्मक अधिष्ठान देण्यासाठी घेतलेला पुढाकार महत्वाचा आहे. सत्तर वर्षीय शरणकुमार लिंबाळे यांची निवड ही सामान्य वाचकांना दिलासा आनंद देणारी आहे. साहित्य जगतासाठी अभिमानास्पद आहे. विवेकी, रचनात्मक परिवर्तनवादी, समरसता ही समतेची पूर्वपायरी आहे यावर विश्वास असणारे यांच्यासाठी ही निवड दिलासा देणारी आहे. सामाजिक वास्तव आणि मानवी भाव-भावना याची जाण असणाऱ्यांसाठी प्रा. डॉ. शरणकुमार लिंबाळे यांच्या निवडीने आशा पल्लवीत केली आहे. प्रा. डॉ. शरणकुमार लिंबाळे यांची अध्यक्षपदी निवड यापूर्वीच होणे आवश्यक होते. साहित्य सृष्टीत पहिल्या पिढीतील दलित साहित्यिक, लेखक यांचे प्रा. डॉ. शरणकुमार लिंबाळे हे संतुलित प्रतिनिधी आहेत. दलित साहित्याचा प्रवाह वाहता ठेवण्यात त्यांचे वैशिष्ट्यपूर्ण योगदान आहे. दलित साहित्याशी ओळख, मैत्री आणि त्यातून एक वास्तवाची जाण समाजाला करून देणाऱ्या बिनीच्या लेखकातील प्रा. डॉ. शरणकुमार लिंबाळे एक आहेत. मात्र, आक्रोश, टीका, धिक्कार हा मार्ग नाकारून समन्वयी वाटेला पसंती दिल्याने साहित्य क्षेत्रातील प्रस्थापितांनी, कंपूशाहीने त्यांना वर्तुळाबाहेर ठेवले. ते अध्यक्ष होणार नाहीत याची काळजी घेतली. जे आपली री ओढत नाहीत. आपल्या अजेंड्याचे समर्थन करत नाहीत ते संघवाले असे ठरवून टाकले होते. प्रा. डॉ. शरणकुमार लिंबाळे यांना असेच संघवाले ठरवून साहित्य व्यवस्थेने अस्पृश्य ठरवले होते. पण, दखल घ्यावी लागते. काम नाकारता येत नाही. योगदान पुसता येत नाही. ऐतिहासिक, स्मरणीय ठरणाऱ्या शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली आहे. हा नियतीचा न्याय आहे.



अध्यक्ष म्हणून निवड झाल्यावर प्रा. डॉ. शरणकुमार लिंबाळे यांच्या साहित्याची चर्चा होणे अपेक्षित आहे. त्यांच्याकडून अपेक्षा व्यक्त होणे अपेक्षित आहे. मात्र, ते न करता निवडीमुळे अस्वस्थ झालेले पुरोगामी-सेक्युलर टोळके तसेच ; लिबरल, न्यू-लेफ्ट, वोक गँगचे मेंबर्स सक्रिय झाले आहेत. अस्वस्थ होऊन व्यक्त होत आहेत. निवड झाल्याचे कळताच त्यांचा बुडाला आग लागली आहे. पोस्टी टाकून वाफा सोडत आहेत.

प्रा. डॉ. शरणकुमार लिंबाळे यांच्या निवडी विषयी नाराजी व्यक्त करताना रा.स्व. संघाचे तिसरे सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांची भेट झाली आणि त्यातून ते संघमार्गी झाले असे सांगत आहेत.

१९९३ साली संघावर तिसरी बंदी होती. बाळासाहेब देवरस हे विश्रांती आणि उपचार यासाठी राजाभाऊ मोगल यांच्याकडे होते. त्यावेळी नाशिक येथे डोंबिवलीचे श्रीपाद जोशी जिल्हा प्रचारक होते. संघाचे कार्यालय कॅन्डा कॉर्नर येथे होते. त्या समोरच्या भागात शरणकुमार लिंबाळे यांचे घर होते. नाशिक येथील अभाविप आणि रा.स्व. संघाचे कार्यकर्ते रवी सहस्त्रबुद्धे यांची शरणकुमार लिंबाळे यांच्याशी ओळख होती. रवी सहस्त्रबुद्धे चांगले वाचक होते. साहित्य आस्वादक होते. नाशिक परिसरातील साहित्यिक, लेखक यांच्याशी त्यांचा संपर्क, संवाद होता. अगदी कुसुमाग्रज यांच्याकडेही रवी सहस्त्रबुद्धे जात असत.

याच रवी सहस्त्रबुद्धे यांनी श्रीपाद जोशी यांच्याशी अक्करमाशी वर गप्पा मारल्या. चला लेखक जवळ राहतात. आपण जाऊया असे म्हणून घेऊन गेले. प्रा. लिंबाळे यांनी स्वागत केले. गप्पा झाल्या. निघताना येत जा. भेटत राहू असे म्हणाले. त्यातून संवाद पुढे गेला.

मात्र, शाखेत या. गणवेश करा. संघाची जबाबदारी घ्या. असे काहीही नव्हते. ओळख, बोलणे आणि त्यातून होणारी मर्यादित मैत्री इतकेच स्वरूप होते.

बाळासाहेब देवरस नाशिकला आलेत. राजाभाऊ मोगल यांच्याकडे आलेत. येता का भेटायला ? असे सहजपणे श्रीपाद जोशी यांनी विचारले. शरणकुमार लिंबाळे हो म्हणाले. मोटर सायकलवरून दोघे गेले. बाळासाहेब देवरस आणि शरणकुमार लिंबाळे भेटले. गप्पा सुरु झाल्या. चला निघतो, शरणकुमार लिंबाळे म्हणाले. बाळासाहेब म्हणाले आता जेवणाची वेळ झाली आहे. जेवून जा. मोगल कुटूंबानेही आग्रह केला. सगळे एकत्र जेवले. श्रीपाद जोशी यांनी पुन्हा त्यांना घरी सोडले आणि ते कार्यालयात गेले. हे असेच आणि इतकेच आहे. संघ, संघाचा विचार, तत्वज्ञान, कार्यपद्धती, कार्यक्रम असे औपचारिक बोलणे नव्हते. सहज संवाद होता. वैचारिकतेपेक्षा सहजता हा संघ आहे. बुद्धीवादापेक्षा मनुष्यकेंद्रित काम हा संघ आहे.

प्रा. डॉ. शरणकुमार लिंबाळे यांचा या भेटीनंतर संघद्वेष्ट्या विचारवंत-बुद्धिजीवींनी छळ सुरु केला. संघवाले असा शिक्का मारून आऊट कास्ट केले. तेच आणि त्यांना आदर्श मानणारे प्रा. डॉ. शरणकुमार लिंबाळे यांच्या निवडीमुळे आदळ-आपट करू लागले आहेत. आपल्यातील एक अध्यक्षपदी निवडला गेला याचा आनंद नसून, आपण नाकारलेला अध्यक्ष झाला याचे दुःख व्यक्त केले जात आहे. हाच पुरोगामी दुटप्पीपणा आहे. यामुळेच मराठी साहित्य-संस्कृतीचा प्रवाह प्रदूषित झालेला आहे. निवडीचे स्वागत करण्याऐवजी नापसंती व्यक्त करणे हा वैचारिक अहंकार आहे. बौद्धिक मस्ती आहे. साहित्य विश्व आपल्या टाचेखाली ठेवण्याची मानसिकता आहे. १९९३ सालची भेट २०२६च्या अध्यक्षपदासाठी हा निष्कर्ष पोरकटपणा आहे. विचारांच्या ठेकेदारांसाठी अशोभनीय आहे.

प्रा. डॉ. शरणकुमार लिंबाळे यांनी ती भेट नाकारली नाही. मिरवली नाही. ते आपल्या श्रद्धा, भूमिका यावर कायम राहिले. लिहिते राहिले. कुणासाठी नाही, कुणाच्या विरोधात नाही. माणूस, समाज, वास्तव केंद्रित साहित्य निर्मितीत सक्रिय राहिले. स्वतःच्या वेदनेचे भांडवल करण्याऐवजी लिखाणातून त्याची सामान्यांना अनुभूती दिली आहे. वाचकांना विचार प्रवृत्त केले आहे. आता अध्यक्षपदालाही न्याय देऊ शकतील. आपल्या कारकिर्दीत साहित्य आणि समाजाचे नाते दृढ करण्यासाठी पुढाकार घेतील. आपल्या अध्यक्षीय भाषणातून सकारात्मकतेने जागरण करतील. प्रसिद्धी, टाळया, लक्ष वेधणे याऐवजी जाणीव-जागृती करतील. शब्दांचे खेळ करण्याऐवजी भान जागवतील.

शरणकुमार लिंबाळे यांचा जन्म १ जून १९५६ रोजी सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील हन्नूर या गावी झाला आहे. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथून त्यांनी मराठी विषयात एम.ए. पदवी संपादन केली. तसेच 'मराठी दलित साहित्य आणि अमेरिकन ब्लॅक साहित्य : एक तौलनिक अभ्यास' या विषयावर पीएच.डी. प्राप्त केली.यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे त्यांनी सहाय्यक संपादक, प्राध्यापक आणि संचालक अशा विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या होत्या. आकाशवाणीत त्यांनी काम केले आहे.

त्यांचे 'अक्करमाशी' (१९८४) हे आत्मकथन मराठी साहित्यातील मैलाचा दगड ठरले आहे. या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद ढहश जींीलरींीश या नावाने प्रसिद्ध झाला. 'दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र', 'सनातन', 'हिंदू', 'बहुजन' आणि 'प्रज्ञासूर्य' ही त्यांची अन्य महत्त्वपूर्ण पुस्तके आहेत. त्यांनी चाळीसहून अधिक ग्रंथांचे लेखन केले असून त्यांच्या साहित्याचे विविध भारतीय व परदेशी भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत. 'दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र' या ग्रंथातून त्यांनी दलित साहित्याची स्वतंत्र साहित्यिक दृष्टी आणि समीक्षा मांडली आहे.

अगदी नुकतीच प्रसिद्ध झालेली त्यांची दलित फाईल्स ही कादंबरी अल्पावधीत वाचक प्रिय ठरत आहे. सेक्स आणि जात या संवेदनशील, गुंतागुंतीच्या विषयाचा थेट वेध घेणारी आहे.

'सनातन' या कादंबरीसाठी त्यांना २०२० मध्ये प्रतिष्ठेचा सरस्वती सन्मान प्रदान करण्यात आला. याशिवाय प्रा. रा. ग. जाधव साहित्यसाधना पुरस्कारासह अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले आहे.

शरणकुमार लिंबाळे यांची निवड साहित्य विश्वातील पुरोगामी दहशत संपवून, वैचारिक वर्चस्ववादाचे उच्चाटन करून विविधतेला स्थान देणारी ठरावी एवढीच माफक अपेक्षा. शरणकुमार लिंबाळे यांचे अभिनंदन आणि शुभेच्छा!

– मकरंद मुळेऊ, ठाणे
पत्रकार, राजकीय – सामाजिक विश्लेषक, विविध विचारांचे अभ्यासक

संविधान दिनानिमित्त पुण्यात बार्टीच्या वतीने 'वॉक फॉर संविधान' रॅलीचे आयोजन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पुणे : भारतीय संविधानाच्या गौरवशाली मूल्यांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी तसेच संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूलभूत तत्त्वांविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने संविधान दिनानिमित्त पुण्यात २६नोव्हेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टीच्या वतीने वॉक फॉर संविधान रॅलीचे आयोजन करण्यात येणार आहे.

बार्टीच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या या रॅलीमध्ये सामाजिक न्याय विभाग, विशेषतः सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी, विविध स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, युवक तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

या रॅलीचा प्रारंभ पुण्यातील ऐतिहासिक भिडे वाडा येथून सकाळी ८.०० वाजता होणार असून, ही रॅली लाल महल, दारुवाला पूल, फडके होद, पंधरा ऑगस्ट चौक, जुनी जिल्हा परिषद या मार्गे जाईल. व रॅलीची सांगता सांगता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुणे स्टेशन येथील पुतळ्याजवळ होणार आहे.

भारतीय संविधानाने देशाला दिलेली लोकशाहीची मूल्ये, सामाजिक न्यायाची संकल्पना आणि समताधिष्ठित समाजनिर्मितीचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. रॅलीच्या माध्यमातून संविधानाविषयी जागरूकता निर्माण करण्याबरोबरच तरुण पिढीमध्ये संविधानिक मूल्यांची रुजवणूक करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. या रॅली नंतर दुपारी १२ ते २ या वेळेत बार्टी मुख्यालयात रायगड येथील संविधानाचे अभ्यासक नूरखान पठाण यांचे भारतीय संविधानावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. तसेच संविधान रॅलीमध्ये संविधानाच्या उद्देशिकेचे वाटपही विनामूल्य करण्यात येणार आहे. संविधान दिनानिमित्त आयोजित या उपक्रमात पुणेकर नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन संविधानाच्या विचारांचा जागर करावा, असे आवाहन बार्टीच्या वतीने करण्यात येत आहे.

शेतकऱ्यांच्या न्यायासाठी शिवसैनिकाची कृषी अधिकारी कार्यालयात बैठक संपन्न

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : राज्यामध्ये चालू असलेल्या दुष्काळाच्या झळा माळशिरस तालुक्याला लागल्यामुळे हवालदिल झालेला शेतकरी चिंतेत पडलेला कष्टकरी पाण्याअभावी शेती पिकवणार कशी उपलब्ध कमी पाण्यामध्ये शेती पिकवावी कशी अशा चिंतेत पडलेल्या शेतकऱ्याला आधार देण्यासाठी शिवसेना ओबीसी सोलापूर जिल्हा प्रमुख राजकुमार हिवरकर पाटील सोलापूर जिल्हा उपप्रमुख दादासाहेब लोखंडे माळशिरस तालुका प्रमुख तानाजीराव भोसले पोळे पाटील सोलापूर जिल्हा संघटक बापूसाहेब लोखंडे माळशिरस तालुका संघटक हेमंत चव्हाण यांनी माळशिरस कृषी कार्यालयामध्ये बैठक घेतली या ठिकाणी तालुक्यामधील कृषी विभागाचे पदाधिकारी कर्मचारी शेतकरी कष्टकरी सर्वसमावेशक बैठक संपन्न होत असताना शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे त्याच्यावर आलेले संकट दूर करण्यासाठी राजकारण न करता सर्वांनी एकत्र येऊन दोन हात पुढे करून शेतकऱ्यांना सहकार्य करावे शासनाने शेती जिविक खते बी बियाणे शासनाच्या वतीने येणाऱ्या संपूर्ण सुख सुविधा या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचल्या पाहिजे ज्या शेतकऱ्यांचे पाण्याअभावी पिकांचे नुकसान झालेले आहे त्या शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन पंचनामे करून झालेल्या नुस्काण्याची भरपाई मिळावी म्हणून कृषी विभागाने तसेच महसूल विभागाने तात्काळ पंचनामे करून सरकारकडे अहवाल पाठवून त्यांना नुकसान भरपाई मिळावी शिवार बैठका घ्याव्या आणि पशुसंवर्धन विभागामार्फत तात्काळ पशूंची जनगणना करून प्रत्येक शेतकऱ्याच्या व पशु धारकाच्या खात्यावर नुकसान भरपाई जमा करावी अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या हिताचे विचार राजकुमार हिवरकर पाटील तसेच दादासाहेब लोखंडे आपल्या मनोगतामध्ये व्यक्त केले उपस्थित कृषी अधिकारी श्री रुपनवर मंडलाधिकारी इतर उपस्थित होते.



नागपूर येथील आरसीआयपीएमसीमध्ये एकात्मिक कीड व्यवस्थापन (आयपीएम) विषयक ५ दिवसीय मनुष्यबळ विकास कार्यक्रमाची सांगता

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नागपूर : प्रादेशिक केंद्रीय एकात्मिक कीड व्यवस्थापन केंद्र (आरसीआयपीएमसी), नागपूर येथे १६ ते २० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत आयोजित एकात्मिक कीड व्यवस्थापन (आयपीएम) विषयक ५ दिवसीय मनुष्यबळ विकास कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली. महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यांमधील एकूण ४३ सहभागी या कार्यक्रमात उपस्थित होते.

विविध कृषी पिकांवर परिणाम करणारे कीटक आणि रोगांची ओळख, त्यांचे सर्वेक्षण आणि पर्यावरणपूरक व्यवस्थापन यासंदर्भात कृषी अधिकारी आणि इतर संबंधित घटकांचे तांत्रिक ज्ञान तसेच क्षेत्रीय स्तरावरील क्षमता बळकट करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

५ दिवसीय कार्यक्रमादरम्यान, व्याख्याने, संवादात्मक सत्रे आणि प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून एकात्मिक कीड व्यवस्थापनाच्या विविध पैलूंवर सहभागींचे तांत्रिक ज्ञान वाढवण्यात आले. यामध्ये कीटक आणि रोगांची ओळख, कीड सर्वेक्षण आणि निरीक्षण, आर्थिक नुकसान पातळी (ईटीएल), कीड व्यवस्थापनाच्या सांस्कृतिक, यांत्रिक, जैविक आणि गरजेनुसार रासायनिक पद्धती, जैव नियंत्रण घटकांचा वापर तसेच कीटकनाशकांचा सुरक्षित आणि योग्य वापर यांचा समावेश होता.

या कार्यक्रमातील तांत्रिक सत्रांमध्ये डॉ. डी. के. नागराजू, संयुक्त संचालक (कीटकशास्त्र), आरसीआयपीएमसी, नागपूर; ज्ञानेश्वर बांचोर, उपसंचालक (कीटकशास्त्र), सीआयपीएमसी, रायपूर; डॉ. रामन्ना कौळगी, सहायक संचालक (कीटकशास्त्र); प्रमोद कुमार मीना, सहायक संचालक (वनस्पती रोगशास्त्र); डॉ. राहुल वाडसकर, कीटकशास्त्रज्ञ आणि सहायक प्राध्यापक, कृषी महाविद्यालय, नागपूर; डॉ. विलास तांबे, कीटकशास्त्रज्ञ आणि प्राध्यापक, कृषी महाविद्यालय, नागपूर; डॉ. नरेश मेश्राम, कीटकशास्त्रज्ञ आणि प्रधान शास्त्रज्ञ, आयसीएआर-केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्था (सीसीएआरआय), नागपूर; डॉ. रचना पांडे, कीटकशास्त्रज्ञ आणि प्रधान शास्त्रज्ञ, आयसीएआर-केंद्रीय कापूस संशोधन संस्था (सीआयसीआर), नागपूर; डॉ. नीलकंठ हिरेमणी, वनस्पती रोगशास्त्रज्ञ आणि वरिष्ठ शास्त्रज्ञ, आयसीएआर-केंद्रीय कापूस संशोधन संस्था (सीआयसीआर), नागपूर; तसेच मिथुन धुमाळ, एपीपीओ, एलसीआयपीएमसी, वडोदरा यांनी मार्गदर्शन केले.

तज्ज्ञांनी सहभागींसोबत आपले तांत्रिक ज्ञान आणि क्षेत्रीय अनुभव सामायिक केले.

राष्ट्रीय कीड सर्वेक्षण प्रणाली (एनपीएसएस) मोबाईल प्लिकेशनचे महत्त्व आणि उपयोग याबाबतही सहभागींच्या जागरूकतेत वाढ करण्यात आली. विशेषतः कीड सर्वेक्षण, कीटक आणि रोगांच्या छायाचित्रांचे अपलोडिंग, क्षेत्रीय निरीक्षणांचे प्रमाणीकरण आणि वेळेवर कीड व्यवस्थापनविषयक सल्ल्यांचा प्रसार यामध्ये या प्लिकेशनच्या उपयोगावर भर देण्यात आला.

समारोप समारंभाला नागपूर येथील विपणन आणि निरीक्षण संचालनालयाचे (डीएमआय) वरिष्ठ लेखाधिकारी मिलिंद रामटेके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. समारोप सत्रादरम्यान सहभागींनी कार्यक्रमाबाबत आपला अभिप्राय व्यक्त केला आणि कार्यक्रमात देण्यात आलेले तांत्रिक मार्गदर्शन, प्रत्यक्ष अनुभव तसेच संवादात्मक शिक्षणाच्या संधींचे कौतुक केले.

प्रमुख पाहुणे आणि इतर मान्यवरांनी वैज्ञानिक आणि पर्यावरणपूरक कीड व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करण्याच्या महत्त्वावर भर दिला. तसेच प्रशिक्षणादरम्यान मिळालेले ज्ञान शेतकरी आणि क्षेत्रीय कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचवून एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतींची व्यापक अंमलबजावणी करण्यासाठी सहभागीना प्रोत्साहित केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रमुख पाहुणे, संसाधन व्यक्ती, सहभागी संस्थांमधील तज्ज्ञ, सहभागी आणि आरसीआयपीएमसी, नागपूर येथील कर्मचारी यांनी दिलेल्या मोलाच्या योगदानाबद्दल आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली.



हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

पडघा येथे निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना मंजुरी पत्रांचे वाटप



सामाजिक कार्यकर्ते दिनेश भोईर यांच्या प्रयत्नांना यश; ३० लाभार्थ्यांना मंजुरी पत्रे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा येथे श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना आणि संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या लाभार्थ्यांना जिल्हा परिषद पडघे केंद्रशाळा येथे मंजुरी पत्रांचे वाटप करण्यात आले. पडघे विभागातील सामाजिक कार्यकर्ते दिनेश भोईर यांच्या विशेष प्रयत्नांमुळे सुमारे ३० लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. यामध्ये पाच दिव्यांग लाभार्थ्यांचाही समावेश असून, त्यांना दिव्यांग प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठीही दिनेश भोईर यांनी विशेष प्रयत्न केले. गरजू, निराधार आणि दिव्यांग नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी दिनेश भोईर यांनी पुढाकार घेतला. लाभार्थ्यांना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यापासून ते शासकीय मंजुरी मिळवून देण्यापर्यंत त्यांनी सहकार्य केले. त्यांच्या या प्रयत्नांतून अनेक गरजू नागरिकांना शासकीय योजनांचा आधार मिळाला आहे. यावेळी भिवंडी पंचायत समितीचे माजी सभापती अशोक शेरेकर, श्रमजीवी संघटनेचे रघू वाघे, स्वाती शिंदे यांची उपस्थिती होती. यावेळी सुमारे ३० लाभार्थ्यांना मंजुरी पत्रांचे वाटप करण्यात आले. शासकीय योजनांचा लाभ समाजातील गरजू घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी दिनेश भोईर यांनी केलेले प्रयत्न उल्लेखनीय ठरले आहेत. निराधार, दिव्यांग आणि गरजू नागरिकांना मदतीचा हात देत त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे. त्यांच्या या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

पिंपळगाव सोनारा येथे बिबट्याच्या हल्ल्यात नीलगाईचा मृत्यू; परिसरात भीतीचे वातावरण

२ कोटी ६ लाखांचा अन्नसाठा जप्त; कंपनीचा परवाना निलंबित

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेडराजा तालुक्यातील पिंपळगाव सोनारा येथे रात्रीच्या सुमारास बिबट्याने हल्ला करून एका नीलगाईचा बळी घेतल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे पिंपळगाव सोनारा आणि परिसरातील शेतकऱ्यांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पिंपळगाव सोनारा येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जीवन गुलाबराव वायाळ आणि नागेश वायाळ यांच्या शेतात ही घटना घडली. रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत बिबट्याने शेतात असलेल्या नीलगाईवर झडप घालून ठार केले. सकाळी हा प्रकार निदर्शनास येताच परिसरात एकच खळबळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच जीवन वायाळ यांनी तात्काळ वनविभागाशी संपर्क साधून याबाबत कळवले. त्यानंतर वनविभागाचे वनरक्षक अरुण साहेब, फुके साहेब आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा व पाहणी केली.

या पाहणीदरम्यान जीवन वायाळ, नागेश वायाळ, शरद ठोसरे, शिवाजी ठोसरे, गजानन शिंगणे, बळीराम शिंगणे, आशिष वायाळ, अक्षय वायाळ, निलेश वायाळ, नागेश ठोसरे यांच्यासह गावातील अनेक शेतकरी मोठ्या



संख्येने उपस्थित होते.

शेतकऱ्यांची मागणी:

परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने शेतात काम करणे कठीण झाले असून शेतकरी आणि ग्रामस्थ धास्तावले आहेत. कोणताही अनुचित प्रकार किंवा जीवितहानी होऊ नये, यासाठी वनविभागाने तात्काळ बिबट्याचा शोध घेण्यासाठी विशेष पथक तैनात करावे आणि परिसरात रात्रीची गस्त वाढवावी, अशी जोरदार मागणी स्थानिक शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

म्युझिकल फाउंटनमधून दिसणार महाराष्ट्राची संस्कृती; मुंबईकरांसाठी अभिमानाचा क्षण : मंत्री मंगल प्रभात लोढा



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : पवई तलावाच्या सौंदर्यात भर घालणारा अत्याधुनिक म्युझिकल फाउंटन मुंबईतील नवे पर्यटन आकर्षण म्हणून विकसित करण्यात आला आहे. मराठ्यांचा देदीप्यमान इतिहास, छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम, महाराष्ट्राची संतपरंपरा, संस्कृती आणि मुंबईची गौरवशाली गाथा आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून या शोमध्ये सादर केली जाणार आहे. या म्युझिकल फाउंटनमुळे मुंबईच्या पर्यटनाला नवी ओळख मिळेल. तसेच पवई तलावाच्या स्वच्छतेवर विशेष लक्ष देण्यात येणार असल्याचे प्रतिपादन कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी केले.

पवई तलाव येथील गणेश घाटावर उभारण्यात आलेल्या 'लाईट, साउंड आणि म्युझिकल फाउंटन शो'चे उद्घाटन मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार, म्हाडाच्या स्लम बोर्डाचे मुख्य अधिकारी सतीश भारतीय यांच्यासह म्हाडा आणि महानगरपालिकेचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मंत्री लोढा म्हणाले, की सुमारे १८० मीटर लांबीचा हा अत्याधुनिक म्युझिकल फाउंटन देशातील सर्वात मोठ्या फाउंटन्सपैकी एक ठरणार आहे. या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठ्यांच्या शौर्याची गौरवगाथा अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने भव्य स्वरूपात सादर केली जाणार आहे. मुंबईकरांसह देश-विदेशातील पर्यटकांनी या शोचा आनंद घ्यावा. पवई तलावाचे नैसर्गिक सौंदर्य जपण्याबरोबरच त्याच्या स्वच्छतेसाठीही विशेष प्रयत्न केले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले.

या प्रकल्पांतर्गत जागतिक दर्जाचा मल्टिमीडिया लाईट अँड साउंड शो साकारण्यात आला आहे. यामध्ये संगीतमय कारंजे, वॉटर स्क्रीन आणि फायर जेट्स यांसारख्या आकर्षक सुविधांचा समावेश आहे. विशेष दृश्य परिणामांच्या माध्यमातून तीन वेगवेगळे चित्रपट सादर केले जाणार असून, इतिहास, संस्कृती आणि वारशाचे दर्शन प्रेक्षकांना घडणार आहे.

या फाउंटनचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तलावातील पाण्याचे ऐरेशन (हवामिश्रण) या प्रक्रियेमुळे दररोज सुमारे ३० लाख लिटर पाण्यात हवा मिसळण्यास मदत होणार असून, पाण्यातील विरघळलेल्या ऑक्सिजनचे प्रमाण वाढण्यास हातभार लागू शकतो. याशिवाय बाष्पीभवनामुळे परिसरात थंडावा निर्माण होणे आणि स्थानिक तापमानात घट होणे असे संभाव्य पर्यावरणीय फायदेही अपेक्षित आहेत.

उद्घाटनानंतर म्युझिकल फाउंटनचा पहिला शो पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. आधुनिक तंत्रज्ञान, इतिहास आणि मनोरंजनाचा संगम असलेला हा प्रकल्प मुंबईच्या पर्यटन नकाशावर पवई तलावाला नवे स्थान मिळवून देणारा ठरण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सामाजिक कार्याची दखल घेऊन इंजिनियर, प्रकाश अनिल शिंदे यांना राज्यस्तरीय 'आदर्श महाराष्ट्र गौरव पुरस्कार' प्रदान

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पुणे प्रतिनिधि/मधुकर रणदिवे सामाजिक सेवा, रक्तदान, वृक्षारोपण तसेच वंचित आणि झोपडपट्टी परिसरातील मुलांमध्ये शिक्षणाविषयी जनजागृती करण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत श्री. प्रकाश अनिल शिंदे यांना राज्यस्तरीय 'आदर्श महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला.

रक्तदानाच्या माध्यमातून गरजू रुग्णांना जीवनदान मिळवून देण्याच्या सामाजिक भावनेतून त्यांनी रक्तदान उपक्रमात योगदान दिले आहे. तसेच वृक्षारोपण आणि पर्यावरण संवर्धनाच्या माध्यमातून निसर्गाचे संरक्षण करण्याचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

विशेषतः झोपडपट्टी परिसरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमधील मुलांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे, त्यांच्यामध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण करणे आणि शिक्षणाच्या प्रवाहात येण्यासाठी प्रोत्साहित करणे, हे त्यांचे सामाजिक कार्यातील



महत्त्वाचे योगदान आहे.

'शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे' या विचारातून प्रत्येक मुलाला शिक्षणाची संधी मिळाली पाहिजे, अशी भूमिका शिंदे यांनी आपल्या सामाजिक कार्यातून मांडली आहे.

रक्तदानातून जीवन वाचविणे, वृक्षारोपणातून पर्यावरणाचे संवर्धन करणे आणि शिक्षणाच्या माध्यमातून वंचित मुलांचे भविष्य घडविणे, या तीन महत्त्वपूर्ण सामाजिक उपक्रमांमधील योगदानाची दखल घेऊन त्यांना हा राज्यस्तरीय सन्मान जाहीर करण्यात आला.

या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन रविवार, दिनांक ६ डिसेंबर २०२६ रोजी पुणे येथील भारत इतिहास संशोधक मंडळ, राजवाडे हॉल, सदाशिव पेठ येथे करण्यात आले आहे. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवंतांचा या सोहळ्यात राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय पुरस्कारांनी गौरव करण्यात येणार आहे.

या सन्मानाबद्दल श्री. प्रकाश अनिल शिंदे यांनी आयोजक राष्ट्र भूषण न्यूज, विजेता मीडिया, फोर्चून मीडिया चे श्री सचिन गोरे, कामगार कल्याण मंडळाचे श्री अविनाश राऊत साहेब, जेबीएम ग्रुप चे उएज श्री मिलिंद जठार व कुटुंबीयांचे, मित्रपरिवाराचे आणि सामाजिक कार्यात सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार व्यक्त केले.

पुरस्कार हा केवळ सन्मान नसून समाजासाठी अधिक जबाबदारीने आणि निष्ठेने कार्य करण्याची प्रेरणा आहे. यापुढेही रक्तदान, पर्यावरण संवर्धन आणि वंचित मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सातत्याने कार्यरत राहण्याचा माझा प्रयत्न असेल, या पुरस्कारामागे त्यांच्या आईचा खारीचा वाटा आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

दुधाळ गायी, म्हशी, शेळ्या, मेंढ्या, कुक्कुटपालन आणि वराहपालनासाठी मिळणार अनुदानाचा लाभ

महा-आयडीद्वारे अर्ज करणे बंधनकारक

पशुपालक आणि शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना; २६ नोव्हेंबरपासून महाडीबीटी २.० वर अर्ज प्रक्रिया सुरू

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

वागदरी/प्रतिनिधी : पुणे : ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला चालना देण्यासह शेतकरी, महिला आणि तरुणांना पशुपालनाच्या माध्यमातून स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' मंजूर केली आहे. या महत्त्वाकांक्षी योजनेच्या ऑनलाइन अर्ज स्वीकृती प्रक्रियेला २६ नोव्हेंबर २०२६ पासून महाडीबीटी २.० प्रणालीवर टप्प्याटप्प्याने सुरुवात होणार आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार जिल्हास्तरीय आणि राज्यस्तरीय योजनांमधील विविध प्रवर्गांचे अर्ज स्वीकारण्यात येणार असल्याची माहिती पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.

या योजनेच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्यांना दुधाळ गायी, म्हशी, शेळ्या, मेंढ्या, कुक्कुटपक्षी आणि वराहपालनासाठी तसेच वैरण उत्पादन व पशुसंवर्धन व्यवसायासाठी आवश्यक निवडक संसाधनांचा अनुदान तत्त्वावर पुरवठा करण्यात येणार आहे. दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन आणि शेळी-मेंढीपालनाला आर्थिक पाठबळ मिळाल्यामुळे ग्रामीण भागात स्वयंरोजगाराच्या नव्या संधी निर्माण होण्यास मदत होणार आहे. शेतकरी आणि पशुपालकांना केवळ पशुधनाचे उत्पादक न ठेवता सक्षम उद्योजक बनविण्याच्या दृष्टीने ही योजना महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य

या योजनेचा लाभ उपलब्ध निधीच्या मर्यादेत 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर पात्र लाभार्थ्यांना देण्यात येणार आहे. त्यामुळे इच्छुक पशुपालक आणि शेतकऱ्यांनी अर्ज करण्यापूर्वी आवश्यक कागदपत्रे व नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून ठेवणे आवश्यक आहे.

असा करा ऑनलाइन अर्ज

योजनेसाठी अर्जदारांना महाडीबीटी २.० (https://mahadbt2.maharashtra.gov.in/) या अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. संकेतस्थळावर 'पशुसंवर्धन विभागाच्या योजना' हा पर्याय निवडून अर्ज प्रक्रिया पूर्ण करता येईल. अर्जदार स्वतःच्या मोबाईल किंवा संगणकावरून तसेच महा-ई-सेवा केंद्र (महा-सेतू) अथवा आपले सरकार केंद्रामार्फत अर्ज करू शकतात.



अर्ज करण्यासाठी महा-आयडीद्वारे लॉगिन करणे बंधनकारक आहे. त्यासाठी महाडीबीटी २.० संकेतस्थळावर आधार प्रमाणीकरण करून महा-आयडी तयार करावा लागेल. महा-आयडी क्रमांक प्राप्त होण्यासाठी साधारणतः २४ तासांचा कालावधी लागतो.

जमीनधारक शेतकऱ्यांसाठी फार्मर आयडी आवश्यक

ज्या अर्जदारांच्या नावे जमीन आहे, मात्र त्यांच्याकडे फार्मर आयडी उपलब्ध नाही, त्यांनी ग्रीस्टॅकच्या फार्मर रजिस्ट्री पोर्टलवर (https://mhfr.agristack.gov.in/farmer-registry-mh//) नोंदणी करून फार्मर आयडी तयार करणे आवश्यक आहे. फार्मर आयडी नसल्यास ज्या योजनांसाठी जमीन असणे आवश्यक आहे, त्या योजनांसाठी अर्ज करता येणार नाही.

फार्मर आयडी तयार असलेल्या अर्जदारांची जमीन व संबंधित माहिती प्रणालीमध्ये उपलब्ध होईल. भूमिहीन तसेच वनहक्कधारक अर्जदारांना त्यांच्या पात्रतेनुसार संबंधित योजनांचे पर्याय उपलब्ध होतील.

अर्ज करताना या बाबींची घ्या काळजी

अर्जदारांची वैयक्तिक माहिती, नाव, पत्ता, जमीन, जात प्रवर्ग आणि शिधापत्रिका क्रमांक आदी माहिती महा-सारथी यूसीडीएच, ग्रीस्टॅक आणि डिजिलॉकरमधून स्वयंचलितपणे प्राप्त होणार आहे. ही माहिती प्राप्त न झाल्यास तारांकित (*) स्वरूपात दर्शविलेली माहिती अर्जदाराने स्वतः भरायची आहे.

योजनेच्या निकषांनुसार अर्जदार पात्र असलेल्या योजनाच त्यांना प्रणालीमध्ये दिसतील. ज्या योजनांमध्ये शेतकरी गट, एफपीओ किंवा संस्था पात्र आहेत, तेथे संस्थेच्या प्रतिनिधींनी स्वतःच्या महा-आयडीद्वारे अर्ज करणे आवश्यक आहे.

अर्ज करताना आवश्यक घटकांची निवड काळजीपूर्वक करावी. अर्ज सादर केल्यानंतर योजना किंवा निवडलेल्या घटकात बदल करता येणार नाही. चुकीची माहिती भरल्याचे लक्षात आल्यानंतर दुरुस्ती करायची असल्यास यापूर्वी सादर केलेले अर्ज रद्द होतील, याची अर्जदारांनी नोंद घ्यावी.

एका कुटुंबातील केवळ एकाच व्यक्तीस या योजनेचा लाभ देय राहणार आहे. त्यामुळे अर्जदारांनी शिधापत्रिका तयार ठेवणे आवश्यक आहे.

अनुदान थेट आधार संलग्न बँक खात्यात

योजनेअंतर्गत मिळणारा लाभ थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) पद्धतीने लाभार्थ्याच्या आधार क्रमांकाशी संलग्न असलेल्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. त्यामुळे अर्ज करण्यापूर्वी बँक खाते आधार क्रमांकाशी लिंक असल्याची खात्री करून घ्यावी.

तसेच, लाभार्थ्यांनी आपल्याकडील पशुधनाची भारत पशुधन प्रणालीवरील नोंदणी अद्ययावत ठेवण्यासाठी जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा.

फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई

योजनेच्या प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणीसाठी पशुसंवर्धन विभागाने काटेकोर नियोजन केले आहे. या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी कोणत्याही खासगी संस्था किंवा व्यक्तीला प्राधिकृत करण्यात आलेले नाही. त्यामुळे योजनेच्या नावाखाली दिशाभूल करणारी माहिती पसरवून लाभार्थ्यांची फसवणूक करणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पशुसंवर्धन विभागाने दिला आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क

योजनेबाबत शंका किंवा अडचणी असल्यास लाभार्थ्यांनी जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात अथवा पशुसंवर्धन विभागाच्या तालुका व जिल्हास्तरीय कार्यालयांशी संपर्क साधावा.

- पशुसंवर्धन विभाग टोल फ्री क्रमांक : १९६२
- व्हॉट्सप चॅटबॉट : ९०६३१४२२९९
- महाडीबीटी पोर्टलवरील तांत्रिक अडचणींसाठी : ०२२-४९१५०८००
- ऑनलाइन अर्ज : https://mahadbt2.maharashtra.gov.in/
- महा-आयडी : https://mahasarathi.maharashtra.gov.in/
- फार्मर आयडी : https://mhfr.agristack.gov.in/farmer-registry-mh//

'समृद्ध पशुधन - विकसित महाराष्ट्र' या संकल्पनेला अनुसरून ग्रामीण भागातील अर्थकारण अधिक गतिमान करण्यासाठी ही योजना महत्त्वपूर्ण ठरणार आहे. ग्रामीण भागातील युवक-युवती, महिला, शेतकरी आणि पशुपालकांनी योजनेची माहिती घेऊन पात्रतेनुसार लाभासाठी अर्ज करावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाने केले आहे.

श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्यासाठी श्री पांडुरंगाचा पालखी सोहळा श्रीक्षेत्र आळंदीकडे मार्गस्थ

सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते पूजन करून पालखीचे प्रस्थान







दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने श्री पांडुरंगाचा पालखी सोहळा सन २०१४ पासून ह.भ.प. विठ्ठल महाराज वासकर यांच्या दिंडीसोबत श्रीक्षेत्र आळंदी येथे नेण्याची परंपरा सुरू आहे. यंदा या पालखी सोहळ्याचे तेरावे वर्ष असून, कार्तिक शुद्ध पौर्णिमेच्या पर्वावर दि. २४ नोव्हेंबर रोजी श्री पांडुरंगाचा पालखी सोहळा श्रीक्षेत्र आळंदीकडे प्रस्थान झाल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

कार्तिक शुद्ध पौर्णिमेनिमित्त आज सकाळी मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांच्या हस्ते श्री पांडुरंगाच्या पादुकांचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर प्रदक्षिणा मार्गावरून पादुकांची मिरवणूक काढण्यात आली. सकाळी ११ वाजता मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर व कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांच्या हस्ते पादुकांचे विधिवत पूजन करून पालखी सोहळ्याचे भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले. या प्रसंगी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतलाताई नडगिरे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, ह.भ.प. विठ्ठल महाराज वासकर, व्यवस्थापक प्रवीणकुमार घम, विभाग प्रमुख संदीप कुलकर्णी, सहा. विभाग प्रमुख पांडूरंग दशपुत्रे तसेच पौराहित्य करणारे कर्मचारी उपस्थित होते.

श्री पांडुरंगाच्या पादुकांचा हा पालखी सोहळा दि. २४ नोव्हेंबर ते दि. १ डिसेंबर या कालावधीत श्रीक्षेत्र आळंदी येथे पोहोचणार आहे. प्रस्थानाच्या प्रवासात एकूण आठ मुक्काम असून, वाखरी, माळशिरस, बरड, सुरवडी, वाल्हे, सासवड, शिवाजीनगर (पुणे) व आळंदी असा प्रवासाचा मार्ग आहे. त्यानंतर परतीचा प्रवास दि. ९ ते १८ डिसेंबर या कालावधीत होणार असून, या प्रवासात फुरसुंगी, सासवड, वाल्हे, कोरेगाव, विडणी, मोरोची, माळशिरस, तोंडले बोंडले असे एकूण नऊ मुक्काम असणार आहेत. या पालखी सोहळ्याच्या नियोजनासाठी सोहळा संपर्कप्रमुख म्हणून मेघराज वळके-पाटील हे कामकाज पाहणार आहेत. या पालखी सोहळ्यासोबत सुमारे ६००० ते ८००० वारकरी सहभागी आहेत. पालखी सोहळ्याच्या मार्गावरील प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी तसेच सकाळच्या विसाव्याच्या ठिकाणी वारकऱ्यांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यामध्ये दुपारचा नैवेद्य, दुपारचा विसावा तसेच इतर आवश्यक सुविधांचा समावेश असून, संबंधित कार्यक्षेत्रातील शासनाच्या विविध विभागांच्या समन्वयातून या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी सांगितले.

गुरुनानक देव यांची शिकवण आचरणात आणावी : डॉ. नारायण बनसोडे



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट : माणुसकीने वागावे, सर्व धर्मांचा आदर करावा, कष्टाला प्रतिष्ठा द्यावी समाजातील दुर्बल घटकांना मदत करावी, ही गुरुनानक यांची शिकवण आचरणात आणावी असे प्रतिपादन संतोष भीमराव पाटील महाविद्यालय मंद्रूप येथील प्राध्यापक व मनपा नगरसेवक डॉ नारायण बनसोडे यांनी व्यक्त केली.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील इतिहास विभागाने शिखांचे धर्मगुरु गुरुनानक देव यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित केला होता, त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते. यावेळी मंचावर प्राचार्य डॉक्टर राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

कल्याणशेट्टी महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने अभिवादन कार्यक्रम

पुढे बोलताना ते म्हणाले की, गुरुनानक यांनी समाजातील जातिभेद, धर्मभेद, अंधश्रद्धा, उच्च नीचतेची भावना आणि सामाजिक विषमतेला विरोध केला, ईश्वर एक आहे सर्व मानव समान आहेत कर्मकांडापेक्षा सदाचार, प्रामाणिकपणा आणि निस्वार्थी सेवा महत्त्वाची आहे अशी शिकवण दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले सूत्रसंचलन प्राध्यापिका डॉक्टर शितल झिंगाडे भस्मे यांनी केले कार्यक्रमाचा उद्देश प्राध्यापक सौरभ भस्मे यांनी विशद केला तर आभार इतिहास विभाग प्रमुख प्रा म धुबाला लोणारी यांनी मानले कार्यक्रमास प्राध्यापिका सौंदर्या शास्त्री, ऐश्वर्या तारापुरे उपस्थित होते.

गुरुद्वारामधील उपक्रम प्रेरणादायी

शिखांचे पहिले धर्मगुरू गुरुनानक यांनी मानवता, विश्वबंधुत्व, समता आणि सामाजिक एकतेचा संदेश दिला, नांदेड येथील गुरुद्वार प्रार्थना स्थळ पाहण्यास गेलो तर तेथील गुरुवाणीचे पठण, लंगर आणि सेवा कार्य पाहून प्रभावित झालो गुरुद्वारा मधील स्वच्छता अन्नदान आदी समाजपयोगी उपक्रम प्रेरणादायी आहेत असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले.

सासवड पोलीस स्टेशनच्या वतीने नशा मुक्ती अभियान – जनजागृती रॅली व शपथविधी संपन्न



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : पुरंदर ::सासवड शहर व परिसर नशा मुक्त करण्यासाठी सासवड पोलीस स्टेशनच्या वतीने आज दिनांक २३/११/२०२६ रोजी भव्य नशा मुक्ती जनजागृती अभियान राबविण्यात आले.

सदर अभियानामध्ये सासवड शहरातील शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ, महिला बचत गट, तरुण मंडळे, व्यापारी व पोलीस कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

अभियानातील ठळक उपक्रम :

१. सासवड शहरातून नशा मुक्ती जनजागृती रॅली काढण्यात आली.

२. विद्यार्थी व नागरिकांनी *नशा सोडा, आयुष्य जोडा!, *व्यसनाला नाही म्हणा, आनंदी जीवनाला हो म्हणा!*, *एकच ध्यास, नशा मुक्त महाराष्ट्र!** अशा घोषणा दिल्या.

३. उपस्थित सर्वांनी नशा न करण्याची व इतरांनाही नशा मुक्तीसाठी प्रवृत्त करण्याची सामूहिक शपथ घेतली.

४. दारू, गुटखा, तंबाखू, गांजा व इतर अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

५. व्यसनाधीन व्यक्तींनी व्यसनमुक्तीसाठी पोलीस स्टेशनशी व समुपदेशन केंद्राशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

अवैध दारू / अंमली पदार्थ विक्रीबाबत माहिती असल्यास सासवड पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल.

– वरिष्ठ पोलीस निरीक्षक
सासवड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण

यावेळी बोलताना *वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संतोष घाळवे साहेब* यांनी सांगितले की, व्यसनामुळे केवळ व्यक्तीच नाही तर संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त होते. तरुण पिढीला व्यसनापासून वाचवणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. नशा मुक्त गाव घडवण्यासाठी पोलीस दल नागरिकांसोबत नेहमी खंबीरपणे उभे राहील. अवैध दारू व अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल.

सदर कार्यक्रमास उपस्थित मान्यवर व अधिकारी :

१) श्री. कैलास चव्हाण – मुख्याधिकारी, नगरपरिषद सासवड

२) श्री. राऊत – सहाय्यक पोलीस निरीक्षक, सासवड पोलीस स्टेशन

३) श्री. गोडसे – पोलीस उपनिरीक्षक, सासवड पोलीस स्टेशन

४) श्री. जाधव – पोलीस उपनिरीक्षक, सासवड पोलीस स्टेशन

५) श्रीमती अर्चना पाटील – महिला पोलीस उपनिरीक्षक, सासवड पोलीस स्टेशन

६) सासवड पोलीस स्टेशनचे सर्व पोलीस अंमलदार

७) पत्रकार बांधव

सदर अभियान यशस्वी करण्यासाठी सासवड पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदार यांनी परिश्रम घेतले.

तानाजी मिटकर यांचे दुःखद निधन



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

वागदरी/प्रतिनिधी : वागदरी तालुका तुळजापूर येथील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा सदन शेतकरी तानाजी लक्ष्मण मिटकरी यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी दि.२१ नोव्हेंबर २२६ रोजी रात्रीच्या सुमारास अकस्मात निधन झाले.

तानाजी मिटकर हे अत्यंत कष्टाळू व प्रेमळ असे व्यक्तिमत्व म्हणून आळखले जात होते. त्यांनी अत्यंत कष्टातून आपल्या मुलांना उच्चशिक्षित करून त्यांचा संसार उभा केला. त्यांचे जेष्ठ चिरंजीव रमाकांत तानाजी मिटकर हे मुंबईसारख्या ठिकाणी चार्टर अकाउंटंट (सी.ए.) म्हणून कार्यरत आहेत.अल्पावधीतच त्यानी मुंबईसारख्या ठिकाणी. आपल्या व्यवसायात मोठे नाव कमावलेले आहे.

कै.तानाजी मिटकर यांच्या निधनाने एक कष्टाळू आणि प्रेमळ व्यक्तिमत एक आदर्श पालक काळाच्या पडदया आड झाले आहे.अशा भावपूर्ण शब्दात त्याना उपस्थित शोकाकूल ग्रामस्थांनी श्रद्धांजली वाहिली त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुलं एक मुलगी भावंडे सुना नाथवंडे जावाई पुतणे असा मोठा परिवार आहे.

विकास कामे, प्रशासनातील अडचणी आणि स्थानिक प्रश्नांबाबत सजग राहण्याच्या सूचना

मुंबईत शिवसेना पक्षाच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षांची बैठक

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे मा.ना. एकनाथ शिंदे साहेब उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत शिवसेना पक्षाच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षांची बैठक पार पडली. या बैठकीला संबोधित करून नगर परिषदेतील विकास कामे, प्रशासनातील अडचणी आणि स्थानिक प्रश्नांबाबत सजग राहण्याच्या सूचना याप्रसंगी सर्व नगराध्यक्षांना केल्या.



राज्यातील दुष्काळाची दाहकता पाहता दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या मदतीसाठी जोमाने काम करा असे यावेळी सुचित केले. नुकत्याच झालेल्या नगर परिषदांच्या निवडणुकीत शिवसेनेचे ६३ नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष आणि हजारो नगरसेवक निवडून आले. हे शिवसेनेच्या इतिहासातील मोठं यश आहे. आजच्या शिबीरामुळे नगरपरिषदांमधील वस्तुस्थिती समोर आली, त्यानुसार नगरविकास विभाग नक्की सहकार्य करेल असे नमूद करत शासन आपल्या दारीच्या धर्तीवर शिवसेना नगराध्यक्ष आपल्या दारी उपक्रम राबवेल असेही याप्रसंगी जाहीर केले. या अभियानाद्वारे नगराध्यक्षांनी घरोघरी जाऊन लोकांच्या समस्या दूर कराव्यात असे मार्गदर्शीत करताना कमी बोला आणि जास्त काम करा, असा सल्ला यावेळी सर्व नगराध्यक्षांना दिला.

विरोधी पक्षासह इतर पक्षांच्या नगरसेवकांबाबत पक्षीय मतभेद न ठेवता नगराध्यक्षांनी सगळ्यांना सोबत घेऊन नगराच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य द्यावे, असा सल्ला देत दुष्काळी भागात ताकदीनं काम करा. बळीराजाला सावरण्यासाठी लाखो हात पुढे आले पाहिजे, असे याप्रसंगी नमूद केले.

युवकांसाठी अभ्यासिका, खेळाची मैदाने आणि त्यांना व्यासपीठ देण्यासाठी आवश्यक प्रकल्प हाती घेण्याच्या सूचना नगराध्यक्षांना देत नमो उद्यानाप्रमाणेच नगर परिषदांच्या क्षेत्रात खेळांच्या मैदानांसाठी एक कोटी रुपयांचा निधी देण्यात येईल, असेही यावेळी जाहीर केले.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून गडकोटांवर स्वच्छता मोहीम सुरु केली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या काळात ज्या उपाययोजना केल्या त्याप्रमाणे गडकोटांवर संविधान दिन साजरा केला जाईल, अशी माहिती याप्रसंगी दिली. या वेळी डॉ.सौ.प्रणिता भगिरथ भालके नगराध्यक्षा पंढरपूर नगरपरिषद यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक ऊस दर देण्याचा मान सहकार शिरोमणी, ओंकार शुगरला



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

भाळवणी : भाळवणी तालुका पंढरपूर सोलापूर जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखाना प्रायव्हेट लिमिटेड सहयोग ओंकार शुगर कार्पोरेशन प्रा. लि. युनिट नंबर १४ चंद्रभागा नगर भाळवणी तालुका पंढरपूर जिल्हा सोलापूर या कारखान्याचे सन २०२६/२७ या गाळप हंगामात सोलापूर जिल्ह्यात सर्वात जास्त ऊस दर जाहीर केला आहे

कारखान्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रति टन ३५००/ रुपये इतका विक्रम इतर दिला आहे. त्यामुळे ऊसाला जिल्ह्यातील इतर कारखान्याच्या तुलनेने हा दर सर्वाधिक असल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाची वातावरण आहे जाहीर केल्याचे दराचे पत्र. शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष उपाध्यक्ष पदाधिकाऱ्यांना कारखान्याच्या व्यवस्थापनाच्या वतीने कारखान्याची जनरल मॅनेजर रवींद्र साळुंखे यांनी दिले.

दरांची तपशीलवार माहिती

प्रति टन तीन हजार पाचशे रुपये

पहिला हप्ता ३३००/

हंगाम संपल्यानंतर शंभर रुपये दुसरा हप्ता

गणित हंगाम २०२६/ २७ मध्ये उत्पादित झालेल्या साखरेला वर्षभर ४५ रुपये दर मिळाल्यास, शंभर रुपये तिसरा हप्ता.

शेतकऱ्यांना आव्हान

चालू विविध हंगामा २०२६ २७ मध्ये शेतकऱ्यांनी आपला ऊस जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी ओंकार शुगर ला गळ पास देऊन देउन सहकार्य करावे, असे आव्हान कारखान्याचे जनरल मॅनेजर रवींद्र साळुंखे यांनी केले आहे.